## भारतीय हवाई दल

■ पदाचे नाव तपशील:
१ अग्निवीरवायु इनटेक
■ शैक्षणिक पात्रता: ५०% गुणांसह १२वी उत्तीर्ण (Mathematics, Physics and English) किंवा इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics / -utomobile / Computer Science / Instrumentation Technology / Information Technology) किंवा गैर-व्यावसायिक विषयासह दोन वर्षांचा व्यावसायिक अभ्यासक्रम उदा. Physics and Mathematics. किंवा ५०% गुणांसह १२वी उत्तीर्ण + ५०% गुणांसह इंग्रजी.
■ शारीरिक पात्रता:
उंची/छाती पुरुष महिला
उंची १५२.५ सेमी १५२ से.मी.
छाती ७७ से.मी./किमान ०५ सेमी फुगवून.
■ वयाची अट: जन्म ०३ जुलै २००४ ते ०३ जानेवारी २००८ दरम्यान.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: ५५०/- + GST
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: २८ जुलै २०२४
■ परीक्षा: १८ ऑक्टोबर २०२४ पासून
■ अधिकृत वेबसाईट https://indianairforce.nic.in/

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## तंत्रज्ञानाचे अवलंबित्व

एखादे तंत्रज्ञान बंद पडल्यानंतर जगभरातील अनेक व्यवहार ठप्प होतात, हे जगाने अनुभवले आहे. मायक्रोसॉफ्टच्या सर्व्हरमध्ये नुकताच बिघाड झाल्याची घटना घडली आणि जगभरात खळबळ उडाली आहे. तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज कंपनीच्या सर्व्हरमधील बिघाडानंतर भारतासह जगभरातील अनेक देशांतील हवाई सेवांवर त्याचा परिणाम झाला आहे. केवळ एअरलाइन्सच नाही तर अनेक देशांच्या बँकिंग यंत्रणा आणि शेअर बाजारांच्या कामकाजावरही परिणाम झाला आहे. मायक्रोसॉफ्टच्या सर्व्हरमध्ये ही समस्या क्राउड स्ट्राइकमुळे आली असल्याचे सांगण्यात येत आहे. असे असले तरी मानवाचे सर्व जीवन तंत्रज्ञानाला जोडलेले आहे, हे खरे ! तंत्रज्ञान नसेल तर ८५ टक्के मानवी जीवन व्यर्थ आहे, असे म्हणता येईल. क्राउड स्ट्राईकमधील एररमुळे मायक्रोसॉफ्ट विंडोज कॉम्प्युटर वापरत असलेल्या जगभरातील युझर्सना अडचणींचा सामना करावा लागत आहे. मायक्रोसॉफ्टच्या सर्व्हरमधील बिघाडामुळे संपूर्ण जगातील कामकाज ठप्प झाले आहे. देशातील एअरलाइन्समध्ये इंडिगो, स्पाइसजेट आणि आकासा एअरचा समावेश असून या फ्लाईट्सच्या बुकिंग आणि चेक इन सेवांवर सर्वाधिक परिणाम झाल्याचे आढळून आले आहे. जग तंत्रज्ञानावर चालले आहे. याचवेळी डोंगरकपाडीत राहणारे वंचित लोक पर्यावरणावर अवलंबून आहेत. काही तंत्रज्ञानाचा पर्यावरणावर परिणाम होतो, तेव्हा मानव जात अस्तित्वहीन होईल अशी भीती व्यक्त होत आहे. क्राउड स्ट्राइकच्या अपडेटनंतर जगभरातील सिस्टीममधील ही अडचण सुरू झाली. या अपडेटनंतर, मायक्रोसॉफ्टचा सपोर्ट असलेली बहुतांश उपकरणे चालू असताना क्रॅश होत आहेत. वापरकर्त्यांना त्यांच्या लॅपटॉपवर अचानक निळा स्क्रीन दिसत आहे आणि लॅपटॉप रिकव्हरी मोडमध्ये जात आहे. क्राऊड स्ट्राईक ही सायबर सुरक्षा कंपनी आहे. हे जगभरातील बहुतेक संगणक आणि लॅपटॉपसाठी प्रगत सायबर सुरक्षा उपाय प्रदान करते. म्हणजे, जे सर्व प्रकारचे सायबर हल्ले रोखते. क्राउड स्ट्राइक ही कंपनी विंडोज कॉम्प्युटर्ससाठी डव्हान्स्ड सायबर संरक्षण उपाय प्रदान करते आणि फाल्कन हे क्राउड स्ट्राइकचे मुख्य प्रॉडक्ट आहे. फाल्कनमधील टेक्निकल एररमुळे हे आउटेज निर्माण झाले आहे. कंपनीचे फाल्कन उत्पादन नेटवर्कवर दुर्भावनापूर्ण किंवा व्हायरसयुक्त फायली शोधते. हे दुर्भावनापूर्ण फाइल्स शोधण्यासाठी आणि व्हायरस थांबवण्यासाठी एआय तंत्रज्ञान वापरते. फाल्कन सिस्टीम ऑनलाइन असो किंवा ऑफलाइन असो, एंडपॉइंट सुरक्षा करू शकते. ब्लू स्क्रीन ऑफ डेथला ब्लॅक स्क्रीन एरर असेही म्हणतात. हार्डवेअर फेलियर ते सॉफ्टवेअर समस्येमुळे ब्लू स्क्रीन ऑफ डेथचा सामना केला जाऊ शकतो. ब्लू स्क्रीन ऑफ डेथ (बीएसओडी) ही विंडोज ऑपरेटिंग सिस्टमवर दिसणारी कोरी निळी स्क्रीन आहे. जेव्हा सिस्टम काही मोठ्या समस्येमुळे क्रॅश होते, जे त्यास सुरक्षितपणे कार्य करण्यापासून प्रतिबंधित करते तेव्हा असे होते. जेव्हा ही समस्या उद्भवते, तेव्हा संगणक अनपेक्षितपणे रीस्टार्ट होऊ शकतो आणि परिणामी जतन न केलेला डेटा गमावला जाऊ शकतो. जर तुमचा लॅपटॉपदेखील बीएसओडी समस्येचा बळी ठरला असेल तर घाबरण्याची गरज नाही, मायक्रोसॉफ्ट आणि क्राउड स्ट्राइक सध्या या समस्येवर काम करत आहेत. ते लवकरच याबाबत तांत्रिक इशारा जारी करू शकतात. परंतु, जोपर्यंत तांत्रिक सूचना जारी होत नाही, तोपर्यंत तुम्ही तुमच्या लॅपटॉपशी कोणत्याही प्रकारे छेडछाड करू नये. सध्या कंपन्या या समस्येच्या निराकरणावर काम करत आहेत आणि लवकरच यासंबंधी अपडेट जारी केले जाऊ शकते.

मायक्रोसॉफ्ट तंत्रज्ञानाचा वापर दैनंदिन जीवनात केला जातो. बीपीओ, कॉल सेंटर क्षेत्रात माहिती मिळवणे व जतन करण्यासाठी मायक्रोसॉफ्ट तंत्रज्ञान वापरले जाते. विमानोड्डाणाची माहिती देण्यासाठी ते तंत्रज्ञान वापरले जाते. शेअरबाजारातील आकडेमोड व माहिती, गणिते याच तंत्रज्ञानावर आधारित आहेत. मानव पूर्णपणे या तंत्रज्ञानावर अवलंबून आहे. मानवाने तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे पर्यावरणाचा नाश केला आहे. हे जरी खरे असले तरी तंत्रज्ञान हे मानवाचे नित्याच्या सवयीचा भाग बनला आहे. हे तंत्रज्ञान व त्यातील धोके कसे टाळता येतील, यावर कधी कधी चर्चा होते ती यामुळेच.

## भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्या जन सुसंवादास उत्स्फूर्त प्रतिसाद

**(पान १ वरून)** नागरी समस्या, नागरी सोयी-सुविधा, महापालिका, सिडको, महावितरण, पोलीस, एमआयडीसी यांच्याशी संबंधित तसेच अन्य वैयक्तिक निवेदने सादर करण्यात आली. गाव गावठाण, नोड, सोसायटी, झोपडपट्टी अशा सर्वच विभागातील नागरिकांनी हजेरी लावली होती. यातील ज्या बहुसंख्य निवेदनांवर लगेचच कार्यवाही करणे शक्य आहे त्यांचा निपटारा करण्यात आला. उर्वरित निवेदनांची कालबद्ध पद्धतीने पाठपुरावा करून सोडवणूक करण्यात येणार आहेत. संबंधित अर्जदार आणि संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात येणार आहे. काही विषयांवर धोरणात्मक निर्णय होणे अपेक्षित आहे. केंद्र सरकार, राज्य सरकार आणि महापालिकेशी संबंधित विविध कल्याणकारी योजनांच्या अर्जांचे वितरण जनसुसंवादामध्ये करण्यात आले. या जनसंपर्क कार्यालया मधून शासकीय योजनांची माहिती देणारा कक्ष सुरू होणार आहे. जनता सुसंवाद पूर्वीपासूनच सुरू होता. बेलापूर येथील कार्यालयातील हा पहिला जनसंवाद होता. जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न प्रामाणिकपणे सोडवण्याचा प्रयत्न करीत असून आगामी काळात जास्तीत जास्त वेळ जनसंपर्क कार्यालयामध्ये उपलब्ध राहणार असल्याचे जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी सांगितले.

## 'एमएमआर' शहरे महामार्गाशी थेट जोडली जाणार, ॲक्सेस कंट्रोल मार्गाची उभारणी

**(पान १ वरून)** या मार्गाच्या उभारणीबाबत एमएमआरडीए आयुक्त संजय मुखर्जी यांच्या उपस्थितीत नुकतीच एमएमआरडीए मुख्यालयात एक महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत या मार्गाच्या उभारणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली असून हा मार्ग गतीने उभारण्याबाबत उपाययोजना राबविण्याच्या सूचना यावेळी खासदार डॉ. शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी टाटा कन्सलटींग इंजिनियर कंपनीने सुचविलेल्या अनेक पर्यायांवर यावेळी त्यांच्या तज्ज्ञांशी खासदार डॉ. शिंदे यांनी संवाद साधला. तर टाटा मार्फत यावेळी बदलापूर ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (तुर्भे – तळोजा – उसाटने आणि खारघर – तुर्भे लिंक रोड) हा रुट ॲक्सेस कंट्रोल मार्गासाठी चांगला पर्याय असल्याचे यावेळी निश्चित करण्यात आले असून हा मार्ग गतीने उभारण्याबाबत उपाययोजना राबविण्याच्या सूचना यावेळी खासदार डॉ. शिंद यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

## विधानपरिषदेत गद्दारी करणाऱ्या काँग्रेसच्या आमदारांवर दोन दिवसांत कठोर कारवाई होणार; दिल्लीत हालचालींना वेग, सूत्रांची माहिती

मुंबई : विधानपरिषद निवडणुकीत फुटलेल्या आमदारांवर कारवाई करण्यात येणार आहे. नुकत्याच झालेल्या विधानपरिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसची मतं फुटल्याचं दिसून आलं. आता काँग्रेसच्या (उेपसीर्शी) फुटलेल्या आमदारांवर कठोर कारवाई होणार आहे. सातही आमदारांना पक्षातून निलंबित करण्याची कारवाई होण्याची शक्यता आहे. या सातही आमदारांवर दोन दिवसात कारवाई होणार आहे. येत्या दोन दिवसात मल्लिकार्जुन खर्गे आणि के सी वेणुगोपाल या संदर्भात घोषणा करणार आहे.

विधानपरिषदेत निवडणुकीत ज्या आमदारांनी पक्षाच्या विरोधात जाऊन मतदान केलं आहे त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली जात होती. त्यानंतर काँग्रेस पक्षाच्या राज्य कार्यकारिणीची महत्त्वाची बैठक देखील झाली. या मागणीनंतर फुटीर आमदारांवर तात्काळ कारवाई होण्याची दाट शक्यता आहे. काँग्रेसच्या या फुटीर आमदारांवर काय कारवाई करणार याची माहिती येत्या दोन दिवसांमध्ये पुढे येणार आहे. चंद्रकांत हांडोरे यांच्या निवडणुकीत मत फुटल्यानंतर या निवडणुकीत काँग्रेसने सावध भूमिका घेतली होती. या निवडणुकीत जे आमदार फुटलेले आहेत त्यांचे पुरावे काँग्रेसकडे असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.


**PUBLIC NOTICE**
**BEFOR THE COURT OF MEMBER MOTOR ACCIDENT CLAIMS TRIBUNAL, THANE AT THANE**

M.A.C.P. NO. 483/2021
Exh No. 15

Mr, ANKUSH HARAGIRAV BHALE — APPLICANT
JANTA BHAVAN SHANTI NAGAR, WAGLE ESTATE, THANE, 400604
V/S
BABURAO VILAS KADAM — OPPONENTS
R/AT - A/P THEUR PHATA GADHAVE
MALA KUNJIRWADI TAL. - HAVELI
PUNE, MAHARASHTRA 412 201

Whereas the above named applicant has filed accident Claims application for the compensation of Rs. 1,00,000 in the Tribunal against you and others. You are hereby given notice to appear in the Tribunal in person or by pleaser duly instructed and to file your say within 30 days from the publication of this notice. Failing which the said application will be heard in your absence and determined ex-parte.
Give under my hand and seal on this day of

By Order

Seal

Sign/-
Superintendent
Motor Accident Claims Tribunal
Thane.

Clerk



सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे विभाग, ठाणे
वेस्ट व्हयू, तिसरा मजला,
राम मारुती रोड,
ठाणे (प.) ४००६०१.

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक :- DYCC /६८३/२०२४ ( MA १०९/२४)
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक :- कै. दिपाताई वृध्दाश्रम व बालकाश्रम सेवाभावी संस्था -पी.टी.आर. नं. एफ/२०७४१/ठाणे,
अर्जदार :- श्री. बाळकृष्ण बाबू आगीवले
सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. सहायक धर्मादाय आयुक्त - २, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग, ठाणे हे वर नमूद केलेल्या फेरफार अर्जासंबंधी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम २२ प्रमाणे चौकशी करणार आहेत. अर्जदार यांनी फेरफार अर्जामध्ये नमूद केले आहे, खालील विश्वस्तांना कार्यकारी मंडळातून / विश्वस्त मंडळातून कमी करण्यात आले आहे.
१) श्री. बाळकृष्ण बाबू आगीवले
२) श्री. संजय रघुनाथ पाटील
३) सौ. वनिता हरी शेलार
४) सौ. दमयंती वैभव कुंभार
५) श्री. रामकृष्ण पी. पाटील
६) सौ. अक्काताई रघुनाथ पाटील
७) श्री. ओमकार संजय पाटील
तसेच खालील नमूद विश्वस्तांच्या कार्यकारी मंडळामध्ये / विश्वस्त मंडळामध्ये नवीन विश्वस्त समाविष्ट करण्यात आल आहे.
१) श्री. बाळकृष्ण बाबू आगीवले
२) सौ. दमयंती वैभव कुंभार
३) श्री. राजेश कुमार जयंतीलाल परमार
४) श्री. विनायक जाऊ पाटील
५) सौ. विशाखा विनायक पाटील
६) श्री. प्रथमेश विनायक पाटील
७) सौ. जान्हवी जयेश भोईर
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी याची लेखी कैफियत, ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, ठाणे विभाग ठाणे यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १९/०७/२०२४ रोजी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग, ठाणे.



सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे विभाग, ठाणे
वेस्ट व्हयू, तिसरा मजला,
राम मारुती रोड,
ठाणे (प.) ४००६०१.

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक :- DYCC /६८२/२०२४ ( MA १०८/२४)
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक :- कै. दिपाताई वृध्दाश्रम व बालकाश्रम सेवाभावी संस्था -पी.टी.आर. नं. एफ/२०७४१/ठाणे,
अर्जदार :- श्री. बाळकृष्ण बाबू आगीवले
सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. सहायक धर्मादाय आयुक्त - २, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग, ठाणे हे वर नमूद केलेल्या फेरफार अर्जासंबंधी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम २२ प्रमाणे चौकशी करणार आहेत. अर्जदार यांनी फेरफार अर्जामध्ये नमूद केले आहे, खालील विश्वस्तांना कार्यकारी मंडळातून / विश्वस्त मंडळातून कमी करण्यात आले आहे.
१) श्री. बाळकृष्ण बाबू आगीवले
२) श्री. संजय रघुनाथ पाटील
३) सौ. वनिता हरी शेलार
४) सौ. दमयंती वैभव कुंभार
५) सौ. अक्काताई रघुनाथ पाटील
६) श्री. रामकृष्ण पी. पाटील
७) श्री. ओमकार संजय पाटील
तसेच खालील नमूद विश्वस्तांच्या कार्यकारी मंडळामध्ये / विश्वस्त मंडळामध्ये नवीन विश्वस्त समाविष्ट करण्यात आल आहे.
१) श्री. बाळकृष्ण बाबू आगीवले
२) श्री. संजय रघुनाथ पाटील
३) सौ. वनिता हरी शेलार
४) सौ. दमयंती वैभव कुंभार
५) सौ. अक्काताई रघुनाथ पाटील
६) श्री. रामकृष्ण पी. पाटील
७) श्री. ओमकार संजय पाटील
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी याची लेखी कैफियत, ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, ठाणे विभाग ठाणे यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १९/०७/२०२४ रोजी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग, ठाणे.



सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे विभाग, ठाणे
वेस्ट व्हयू, तिसरा मजला,
राम मारुती रोड,
ठाणे (प.) ४००६०१.

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक :- DYCC /६८१/२०२४ ( MA १०७/२४)
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक :- कै. दिपाताई वृध्दाश्रम व बालकाश्रम सेवाभावी संस्था पी.टी.आर. नं. एफ/२०७४१/ठाणे,
अर्जदार :- श्री. बाळकृष्ण बाबू आगीवले
सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. सहायक धर्मादाय आयुक्त - २, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग, ठाणे हे वर नमूद केलेल्या फेरफार अर्जासंबंधी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम २२ प्रमाणे चौकशी करणार आहेत. अर्जदार यांनी फेरफार अर्जामध्ये नमूद केले आहे, खालील विश्वस्तांना कार्यकारी मंडळातून / विश्वस्त मंडळातून कमी करण्यात आले आहे.
१) श्री. बाळकृष्ण बाबू आगीवले
२) श्री. संजय रघुनाथ पाटील
३) सौ. वनिता हरी शेलार
४) सौ. दमयंती वैभव कुंभार
५) श्री. ओमकार संजय पाटील
६) सौ. अक्काताई रघुनाथ पाटील
७) श्री. रामकृष्ण पी. पाटील
तसेच खालील नमूद विश्वस्तांच्या कार्यकारी मंडळामध्ये / विश्वस्त मंडळामध्ये नवीन विश्वस्त समाविष्ट करण्यात आल आहे.
१) श्री. बाळकृष्ण बाबू आगीवले
२) श्री. संजय रघुनाथ पाटील
३) सौ. वनिता हरी शेलार
४) सौ. दमयंती वैभव कुंभार
५) सौ. अक्काताई रघुनाथ पाटील
६) श्री. रामकृष्ण पी. पाटील
७) श्री. ओमकार संजय पाटील
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी याची लेखी कैफियत, ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, ठाणे विभाग ठाणे यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १९/०७/२०२४ रोजी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग, ठाणे.

# गट ब आणि क संवर्गातील भरती थेट 'एमपीएससी'तर्फे होणार


## आ. निरंजन डावखरेंच्या मागणीला यश, लाखो स्पर्धा परीक्षार्थींना दिलासा



**ठाणे : राज्य सरकारच्या सेवेतील व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट ब (अराजपत्रित) व गट क संवर्गातील (वाहन चालक वगळता) सर्व पदे सरळसेवेने टप्प्याटप्प्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) भरण्याचा निर्णय राज्य सरकारने जाहीर केला. या संदर्भात कोकण पदवीधर मतदारसंघातील भाजपाचे आमदार निरंजन डावखरे यांच्याकडून सातत्याने मागणी केली जात होती. या निर्णयामुळे राज्यातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या लाखो परीक्षार्थींना दिलासा मिळाला आहे.**

राज्य सरकारच्या विविध खात्यांमार्फत ब, क आणि ड संवर्गाची पदे स्थानिक जिल्ह्याच्या निवड समित्यांमार्फत भरली जात होती. मात्र, त्यात सुसूत्रता येण्यासाठी ब व क संवर्गाची पदे 'एमपीएससी'मार्फत भरावीत, अशी मागणी आमदार निरंजन डावखरे यांच्याकडून सातत्याने विधान परिषदेत व राज्य सरकारकडे केली जात होती. या संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आणि तत्कालीन अपर मुख्य सचिव नितीन गद्रे यांच्याकडे पाठपुरावा केला जात होता. त्यानंतर राज्य सरकारने २ नोव्हेंबर २०२२ रोजी गट क मधील लिपिक संवर्गातील पदे 'एमपीएससी'मार्फत भरण्यासाठी मान्यता दिली होती. या संदर्भात राज्य सरकारने तज्ज्ञ समिती नियुक्त केली होती. या समितीने गट ब व गट क संवर्गातील पदे 'एमपीएससी'च्या कक्षेत आणण्याची सूचना केली होती. त्यानुसार राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने आज हा निर्णय घेतला.

या निर्णयाने राज्यातून स्पर्धा परीक्षा देणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. गट ब व गट क संवर्गासाठी राज्यातील प्रत्येक विभागातील परीक्षेसाठी वेगळी जाहिरात, स्वतंत्र परीक्षा आणि निकालांमध्ये बराच अवधी जात होता. त्याचबरोबर या परीक्षांसाठी वेगवेगळे शुल्क विद्यार्थ्यांना भरावे लागत होते. मात्र, आता एकच परीक्षा होणार असल्यामुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल, अशी प्रतिक्रिया आमदार निरंजन डावखरे यांनी व्यक्त केली. तसेच या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले आहेत.



# भाईंदर उत्तन येथील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे काम रद्द करा

## मिरारोड येथे आधुनिक मच्छिमार्केट बांधण्यासाठी राज्य सरकारकडून ५० कोटींचा निधी आणणार : आमदार सरनाईक

**आमदार प्रताप सरनाईक यांचे राज्याच्या मत्स्यव्यवसाय मंत्र्यांना पत्र**

भाईंदर : मिरा भाईंदर उत्तन येथील मच्छिमारांचा विरोध असलेल्या धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे काम तात्काळ रद्द करण्यात यावे व मिरारोड येथे अत्याधुनिक मच्छी मार्केट बांधण्यासाठी ५० कोटींचा निधी देण्याची मागणी आमदार प्रताप सरनाईक यांनी केली आहे. त्यांनी याबाबत महाराष्ट्र सरकारचे मत्स्यव्यवसाय विभाग मंत्री सुधीर मुनगंटीवार यांना आज पत्र पाठवले आहे. त्याआधी आमदार सरनाईक यांनी भाईंदर उत्तन येथील मच्छिमार - कोळी बांधवांची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. उत्तन समुद्र किनाऱ्यावर मच्छिमारांसह प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीची पाहणीही केली. ज्या कामाला स्थानिक नागरिकांचा विरोध आहे, जे काम करताना कोणालाही विश्वासात घेतलेले नाही ते काम रद्द झालेच पाहिजे, अशी भूमिपुत्रांच्या बाजूची भूमिका आमदार सरनाईक यांनी घेतली आहे.

उत्तन येथे दोन दिवसांपूर्वी आमदार सरनाईक यांनी जाऊन मच्छिमारांच्या मागण्या व समस्या जाणून घेतल्या. येथील सभागृहात मच्छिमार संघटना, त्यांचे प्रतिनिधी यांच्यासह मेळाव्यात आमदार सरनाईक यांनी संवाद साधला. भूमिपुत्रांची भूमिका - समस्या - मागण्या जाणून घेतल्यावर आमदार सरनाईक यांनी आपली भूमिका मांडली तसेच उत्तनच्या समुद्रकिनाऱ्यावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती बघितली.

भाईंदर उत्तन येथील देवतलाव बंदरावर राज्य शासनाकडून धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे काम सुरु करण्यात आले आहे. या बंधाऱ्याला स्थानिक मच्छीमारांचा तीव्र विरोध आहे. मच्छिमार, स्थानिकांचा विरोध असेल तर हे काम तात्काळ थांबवले गेले पाहिजे व रद्द केले गेले पाहिजे. ज्या ठिकाणी हे बंधाऱ्याचे काम होणार आहे त्याठिकाणी मच्छिमार अनेक वर्षे मासे सुकत टाकतात तसेच, तिकडे त्यांच्या बोटीही लागतात. अशात हा बंधारा झाला तर भविष्यात मच्छिमारांवर मोठे संकट येईल, अशी तक्रार स्थानिकांनी माझ्याकडे केली आहे. याप्रकरणी तहसीलदारांकडून माहिती घेतली असता असे लक्षात आले की , पर्यावरण विभाग किंवा स्थानिक तहसीलदार यांची कोणतीही परवानगी न घेता हे बंधाऱ्याचे काम सुरु करण्यात आले आहे , अशी माहितीही आमदार सरनाईक यांनी दिली.

### ५० कोटी इतका निधी मंजूर करावा

*भाईंदरचा समुद्रकिनारा उत्तन व आसपासच्या परिसरातील लोक वर्षानुवर्षे मासेमारीचा व्यवसाय करतात. त्यांच्या माशांना बाजारपेठ व हक्काची कायमस्वरूपी मोठी जागा मिळावी म्हणून मीरा भाईंदर शहरात महापालिकेच्या माध्यमातून मीरारोड येथे मी या प्रस्तावित मार्केटसाठी जागा उपलब्ध करून देणार आहे. जागा उपलब्ध आहे, त्या जागेवर हे आधुनिक, सर्व सुविधा असलेले वातानुकूलित मच्छिमार्केट बांधण्यासाठी राज्य सरकारने ५० कोटी इतका निधी मंजूर करावा, अशी मागणी आमदार प्रताप सरनाईक यांनी केली आहे. वर्षानुवर्षे मच्छिमार हा व्यवसाय करतात, त्यांच्या व्यवसायासाठी चांगली जागा, सर्व आधुनिक सुविधा मिळाल्या पाहिजेत यासाठी हा निधी राज्य सरकारकडून मी मंजूर करून आणेन असा शब्द त्यांनी मच्छिमारांना दिला.*

*आमदार प्रताप सरनाईक यांच्यासह शिवसेनेचे मिरा भाईंदर विधानसभा प्रमुख विक्रमप्रताप सिंग व मच्छिमार समाजाचे प्रतिनिधी तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.*

एखाद्या भागात कोणतेही विकासकाम जर स्थानिक नागरिकांच्या , भूमिपुत्रांच्या हिताचे होणार असेल तर आधी त्यांना विश्वासात घेणे , त्यांचे म्हणणे जाणून घेणे आवश्यक आहे. पण ठेकेदाराच्या फायद्यासाठी बंधाऱ्याचे काम हाती घेतले आहे असा लोकांचा आरोप आहे. यात स्थानिक मच्छिमार - कोळी बांधवांचा कोणताही फायदा नाही. कोणालाही सदरचे बंधाऱ्याचे काम सुरु करताना विश्वासात घेतलेले नाही त्यामुळे हे बंधाऱ्याचे काम तात्काळ रद्द करावे अशी मागणी आमदार सरनाईक यांनी केली आहे.

मुंबई , ठाणे ही शहरे आगरी-कोळी बांधवांची म्हणून ओळखली जातात. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांनी भूमिपुत्रांच्या न्याय - हक्क व अधिकारासाठी शिवसेनेची स्थापना केली. मी माझ्या पक्षाच्या शिकवणीप्रमाणे कायम भूमिपुत्रांच्या बाजूने लढत आलो आहे. अशावेळी भाईंदरच्या उत्तन येथील भूमिपुत्र, मच्छिमार - कोळी बांधवांच्या न्याय हक्कासाठी राज्य सरकारने त्यांच्या हिताचाच निर्णय घ्यावा. याबाबत आपण आढावा घेऊन तात्काळ हे बंधाऱ्याचे काम थांबवावे व काम रद्द करण्याचे आदेश द्यावेत, असे आमदार सरनाईक यांनी पत्रात म्हटले आहे.

# विरार पोलिसांच्या धमकीमुळे आत्महत्या

विरार : विरार पोलिसांनी केलेल्या दमदाटीमुळे आत्महत्या करणार्या अभय पालशेतकरच्या आईला १० लाखांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश मानवाधिकार आयोगाने दिले आहेत. २१ एप्रिल रोजी अभयने आत्महत्या करण्यापूर्वी चित्रफित तयार करून पोलिसांनी धमकी दिल्याचे सांगितले होते. विरार पुर्वेच्या मनवेलपाडा येथे अभय पालशेतकर (२८) हा पत्नी आरोही पालशेतकर (२५) हिच्यासोबत रहात होता. वर्षभरापूर्वीच त्यांचे लग्न झाले होते. त्यांच्यात कौटुंबिक वाद होते. २१ एप्रिल रोजी त्याच्या पत्नीने अभय विरोधात पोलिसात तक्रार दिली होती. त्यानंतर पोलिसांनी अभयला बोलावून १४९ अंतर्गत नोटीस देऊन समज दिली होती. घरी आल्यावर अभयने घरातील हॉलच्या छताला साडीच्या सहाय्याने गळफास लावून आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी त्याने एक चित्रिफत तयार करून नातेवाईकांना पाठवली. सुनिल पवार नामक पोलिसाने टायर मध्ये घालून मारण्याची धमकी दिल्याने मी आत्महत्या करत असल्याचे या चित्रफितीत त्याने सांगितले होते. परंतु विरार पोलिसांनी फक्त अभयच्या पत्नीवरच गुन्हा दाखल केला आणि पोलिसांची फक्त विभागीय चौकशी करण्याचे निर्देश दिले होते.

# भारतीय मराठा महासंघाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी महेश कदम



ठाणे : भारतीय मराठा महासंघाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी महेश परशुराम कदम यांची निवड करण्यात आली. याबाबतची घोषणा मावळते अध्यक्ष डॉ. आप्पासाहेब आहेर यांनी शुक्रवारी १९ जुलै रोजी ठाण्यात आयोजित जाहिर पत्रकार परिषदेत केली. याप्रसंगी, महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष जयदीप वरखिंडे, सरचिटणीस राम शिंदे, राष्ट्रीय प्रवक्ता राजन गावंड, प्रदेश उपाध्यक्षा ड. स्वाती फडतरे, महासंघाचे कार्यकारिणी सदस्य संजय पाटील, प्रसाद घोरपडे आदी उपस्थित होते.

भारतीय जनता पार्टीचे ठाणे शहर जिल्हा उपाध्यक्ष असलेले महेश परशुराम कदम गेली अनेक वर्षे स्वामी फाऊंडेशनच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक तसेच आरोग्य विषयक उपक्रम राबवत आहेत. गतवर्षी पासुन भारतीय मराठा महासंघाच्या उपाध्यक्ष पदी असलेल्या महेश कदम यांनी, मराठा समाजासाठी वेगवेगळ्या माध्यमातून कार्य केले. त्याची दखल घेत महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीने कदम यांची महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणुन निवड केली. यावेळी बोलताना महेश कदम यांनी, ठाण्यातील सर्वसामान्य कार्यकर्त्याला प्रदेश अध्यक्षपदाची ही मोठी जबाबदारी दिलेली आहे. तेव्हा भविष्यात ही जबाबदारी पार पाडताना संपुर्ण महाराष्ट्रातील कार्यकारिणी निवडून समाजकार्यात अग्रेसर राहणार असल्याचे स्पष्ट केले. तसेच, भविष्यात होणाऱ्या निवडणुकीसाठी योग्य वेळी निर्णय घेऊ तरी जो व्यक्ती मराठा समाजासाठी चांगले काम करेल त्याच्या पाठीशी भारतीय मराठा महासंघ असेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. दरम्यान, महेश कदम यांची भारतीय मराठा महासंघाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याने त्यांच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तसेच महेश कदम यांनी यावेळी पत्रकारांशी बोलताना विविध विषयांवर चर्चा केली.

# आषाढी एकादशीनिमित्त 'श्री माँ'मध्ये संतांच्या जीवनावर आधारित कार्यक्रम सादर





ठाणे : श्री माँ विद्यालय घोडबंदरच्या वतीने आषाढी एकादशीचा विशेष कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या पावन दिवशी धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी शाळेचा परिसर गजबजून गेला होता. आषाढी एकादशी निमित्त श्री माँमध्ये संतांच्या जीवनावर आधारित नाटिका कार्यक्रम सादर

या सोहळ्यात श्री माँ विद्यालय व श्री माँ बाल निकेतन या दोन शाळांतील सुमारे १९० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. दिंडीने या कार्यक्रमाची सुरूवात झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध संतांच्या वेशभूषा करून त्यांच्या अभंगांच्या माध्यमातून त्यांचा जीवनपट उलगडून दाखवला. विद्यार्थ्यांनी भजन, कीर्तन, नृत्य आणि संतांच्या जीवनावर आधारित नाटिका सादर केल्या. विद्यार्थ्यांचे प्रदर्शन अतिशय मनमोहक होते आणि त्यांनी आपल्या अभिनयाने सर्वांची मने जिंकली. संत तुकाराम, राका-बाका, नरहरी सोनार, संतसुरदास आदी महान संतांचा त्यात समावेश होता.

श्री माँ हॉल येथून दिंडीला प्रारंभ झाला. दिव्य श्री तारा माँ यांच्या उपस्थितीत शाळेतील विद्यार्थ्यांनी दिंडी, हरिपाठ, भजन, अभग सादर करत विठू नामाचा गजर सादर केला. सुधीर फडके द्वारा गायलेले अभंग मुलांनी सादर केले. नर्तन किर्तन, संकीर्तन सादर करण्यत आले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते. यावेळी दिव्य श्री तारा माँ यांनी आषाढी एकादशीचे महत्त्व सांगत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

शाळेत साजऱ्या झालेल्या आषाढी एकादशीचा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरला. धार्मिक महत्त्वाबरोबरच सांस्कृतिक गुणांचे प्रदर्शन करण्यासाठी विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळाले. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये एकात्मता आणि भक्तिभाव जागवणारा ठरला.

नवी मुंबईतील पाणीपुरवठा वितरण प्रणालीचे

# आयुक्तांनी केले राष्ट्रीय कार्यशाळेत प्रभावी सादरीकरण

नवी मुंबई : केंद्र सरकारच्या गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाच्या वतीने 'अमृत २' प्रकल्पांतर्गत विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे आयोजित 'नळातून पेयजल' या राष्ट्रीय कार्यशाळेत 'नवी मुंबईतील नाविन्यपूर्ण जलदेयके वितरण व संकलन यंत्रणा (Innovative Billing and Collection Mechanism of Navi Mumbai)' या विषयावर सादरीकरण करण्यास नवी मुंबई महानगरपालिकेस निमंत्रित केले होते. त्यास अनुसरुन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी पाणीपुरवठा प्रणालीविषयी विस्तृत माहिती देत राष्ट्रीय कार्यशाळेत प्रभावी सादरीकरण केले. यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेचा नावलौकिक राष्ट्रीय पातळीवर आणखी उंचावलेला आहे.

गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालय, भारत सरकारच्या अतिरिक्त सचिव तथा अमृत प्रकल्पाच्या राष्ट्रीय मिशन संचालक श्रीम. डी.थारा यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या पाणीपुरवठा विषयक महत्वाच्या राष्ट्रीय कार्यशाळेत देशभरातील विविध शहरांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. सर्व शहरांना पुरेसा पाणीपुरवठा होईल असे व्यवस्थापन करणे व त्याचे सुयोग्य नियोजन करणे याविषयी या कार्यशाळेत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याचप्रमाणे काही शहरात राबविल्या जाणाऱ्या पाणीपुरवठा विषयक उल्लेखनीय कार्यप्रणालीचे सादरीकरणही सर्वांच्या माहितीसाठी आयोजित केले होते.

यामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेची पाणीपुरवठा देयके वितरण करण्याची व संकलित करण्याची वैशिष्ट्यपूर्ण कार्यप्रणाली राष्ट्रीय पातळीवर सादरीकरण करण्याची संधी नवी मुंबई महानगरपालिकेस देण्यात आली. त्या अनुषंगाने नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा वितरण प्रणालीसह पाणीपुरवठा देयकांचे वितरण व संकलन यंत्रणेविषयी अभ्यासपूर्ण सादरीकरण केले. याप्रसंगी उपस्थित देशातील विविध शहरांच्या अधिकारी प्रतिनिधींकडून या कार्यप्रणालीची प्रशंसा करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत २४X७ पाणीपुरवठा योजनेची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी केली जात असून पाणीपुरवठा व्यवस्थेवरील नियंत्रणात्मक स्काडा प्रणाली अदययावतीकरणाचे काम हाती घेतले जात आहे. त्याचप्रमाणे पाणी देयक भरणा करणे अधिक सुलभ व्हावे यादृष्टीने युपीआय व क्यूआर कोडव्दारे देयक भरणा करण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली जात आहे.

अमृत प्रकल्पांतर्गत आयोजित या पाणीपुरवठा विषयक महत्वाच्या राष्ट्रीय कार्यशाळेस नमुंमपा आयुक्तांसमवेत अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, कार्यकारी अभियंता वसंत पडघन, अभियंता स्वप्निल देसाई उपस्थित होते.

# अतिसार प्रतिबंधक अभियानांतर्गत जलसुरक्षक यांची कार्यशाळा संपन्न

ठाणे : अतिसार प्रतिबंधक अभियानांतर्गत भिवंडी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत जलसुरक्षक यांची तालुकास्तरावर कार्यशाळेचे दि. १८ जुलै रोजी आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्घाटन प्रकल्प संचालक अतुल पारसकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी डॉ. प्रदीप घोरपडे, कार्यशाळेसाठी शाळेचे प्रमुख मार्गदर्शन करण्यासाठी केमिस्ट विभागीय सह नियंत्रण कक्ष बेलापूर येथील सचिन तारमाळे, पंचायत समिती भिवंडी येथील आरोग्य विभागाचे आरोग्य पर्यवेक्षक दिलीप जाधव उपस्थित होते.

कार्यशाळेच्या उद्घाटन पर भाषणात अतुल पारसकर यांनी सर्व जलसुरक्षकांना ही मोहीम यशस्वी करण्यासाठी योग्य त्या सूचना दिल्या. यावेळी त्यांनी विविध पाणी नमुने घेण्याच्या चाचण्या आणि गाव स्तरावर जलसुरक्षक यांच्या कर्तव्य जबाबदाऱ्या याबाबत देखील मार्गदर्शन केले. या मोहीम कालावधीत पाणी गुणवत्तेबाबत जास्तीत जास्त गावातील लोकांची जाणीव जागृती करण्याबाबत जलसुरक्षक यांना योग्य त्या सूचना दिल्या.

केमिस्ट विभागीय सनियंत्रण कक्ष बेलापूर सचिन तारमाळे यांनी रासायनिक पाणी नमुने तपासणीच्या सर्व चाचण्या कशा पद्धतीने पूर्ण करावे व जैविक पाणी नमुने चाचण्या कशा पद्धतीने पूर्ण करावे याबाबत सखोल मार्गदर्शन केले. आरोग्य पर्यवेक्षक दिलीप जाधव यांनी गावातील लोकांना स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी कसे देता येईल याबाबत योग्य ते मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचा समारोप भिवंडी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी सुधाकर सोनवणे यांनी केले.

# ओला आणि सुका कचऱ्यांचे वर्गीकरण करण्यासाठी विशेष मोहिम

ठाणे : आपल्या परिसरातील व घरातील ओला आणि सुका कचरा योग्य प्रकारे वर्गीकृत करण्यासाठी जिल्ह्यात दिनांक ८ जुलै २०२४ पासून विशेष मोहिम राबवण्यात येत आहे. या कालावधीत विशेष मोहिम राबविण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत, त्यानुसार जिल्ह्यातील प्रत्येक गावात स्वच्छतेचे दोन रंग, ओला हिरवा, सुका निळा या नावाने अभियान राबवण्यात येत आहे.

स्वच्छतेचे दोन रंग, ओला हिरवा, सुका निळा अभियान राबवण्यात येत असून ओला व सुका कचरा व्यवस्थापनासाठी ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे तसेच प्रकल्प संचालक, जलजीवन मिशन अतुल पारसकर यांनी केले आहे.

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-२ अंतर्गत डिसेंबर २०२४ पर्यंत ठाणे जिल्हा (ग्रा) हागणदारीमुक्त अधिक मॉडेल करावयाचे आहे. मॉडेल झालेल्या गावात दृष्यमान शाश्वत स्वच्छता ठेवणे आणि हागणदारीमुक्त अधिक झालेली गावे मॉडेल करणे यासाठी विविध विषयाच्या अनुषंगाने गृहभेटीच्या माध्यमातून जनजागृतीसाठी विशेष अभियानाचे आयोजन करण्यात येत आहे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रत्येक गावात ५ संवादकाची निवड करण्यात आली असून हे संवादक गृहभेटीतून माहिती देत आहेत. यासाठी सरपंच, उपसरंपच, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, ग्रामसेवक, आशावर्कर, अंगणवाडी सेविका, स्वच्छाग्रही व बचत गटातील महिलांचा समावेश आहे.

## आ. राजू पाटील यांचा नातेवाईक असल्याचे सांगून

# ५० हून अधिक जणांना गंडा घालणारा अटकेत

डोंबिवली - आपण काटई येथील आमदार राजू पाटील यांचा भाचा आहोत. आपण त्यांच्या सोबतच्या बैठकीत भेटलो होतो. आपण तुम्हाला ओळखतो असे ठाणे, मुंबई परिसरातील रस्त्याने चाललेल्या पादचाऱ्यांना थांबवून सांगायचे. पादचाऱ्यांना बोलण्यात गुंतवून त्यांना भुरळ घालून त्यांच्या जवळील सोन्याचा, रोख रक्कम घेऊन पळून जायचे. अनेक महिने आमदार पाटील यांच्या नावाने लबाड्या करणाऱ्या भिवंडीजवळील शेलार गावातील एका भामट्याला विष्णुनगर पोलिसांनी नवी मुंबईतून कौशल्याने मंगळवारी अटक केली.

विजय दत्ताराम तांबे (५५, रा. शेलार गाव, भिवंडी) असे आरोपीचे नाव आहे. त्याने ठाणे, मुंबई परिसरात अशाप्रकारचे ५० हून अधिक गुन्हे केले असल्याची कबुली विष्णुनगर पोलिसांना दिली आहे. अनेक दिवस पोलीस या भामट्याच्या मागावर होते. विष्णुनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पवार यांनी सांगितले, गेल्या महिन्यात डोंबिवलीतील रेल्वे मैदान भागातील सोसायटीत राहणारे सेवानिवृत्त गणेश कुबल महात्मा फुले रस्त्यावरील बँकेत पैसे काढण्यासाठी आले होते. पैसे काढल्यानंतर ते गुप्ते रस्त्यावर खरेदीसाठी गेले. गोपी मॉल भागातील रस्त्याने पायी घरी चालले होते. तेवढ्यात त्यांना एका इसमाने हाक मारून थांबवले.

अनोळखी इसमाने मला ओळखले का. मी आमदार राजू पाटील यांचा भाचा. आपण एका बैठकीत भेटलो होतो असे बोलून कुबल यांच्याशी इसमाने लगट केली. आपण तुम्हाला ओळखूनही तुम्ही मला ओळखत नाहीत याचे आश्चर्य वाटते. असे बोलून कुबल यांचा विश्वास इसमाने संपादन केला. बोलण्याच्या गडबडीत इसमाने कुबल यांना भुरळ घालून त्यांच्या खिशातील आठ हजार रुपये रोख, गळ्यातील सोनसाखळी असा ऐवज काढून घेतला. तुम्ही वृद्ध आहात. कोणी पण ते लुटेल असे बोलून इसमाने रोख रक्कम, सोनसाखळी ऐवज एका रुमालात गुंडाळून तो कुबल यांच्या विजारीच्या मागील खिशात ठेवल्याचा भास निर्माण केला. या इसमाच्या जवळ अन्य एक इसम दूरवर उभा होता. इसमाने कुबल यांना आता तुम्ही घरी जा. ओळख ठेवा, असे बोलून कुबल यांना जाण्याचा इशारा केला. कुबल काही अंतर पुढे गेल्यावर त्यांनी मागील विजारीच्या खिशात पैसे, सोनसाखळीचे पुडके नव्हते. ते पुन्हा माघारी आले तोपर्यंत तो इसम आणि त्याचा साथीदार पुडके घेऊन पसार झाले होते

कुबल यांनी विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. पोलिसांनी गोपी मॉल भागातील सीसीटीव्ही चित्रण तपासून आरोपीची ओळख पटवून त्याचा शोध सुरू केला होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पवार, पोलीस निरीक्षक गहिनाथ गमे, साहाय्यक पोलीस निरीक्षक सचीन लोखंडे, पोलीस उपनिरीक्षक दीपकुमार भवर यांच्या मार्गदर्शनाखालील तपास पथकाला आरोपी विजय तांबे नवी मुंबई भागात येणार आहे अशी गुप्त माहिती मिळाली. पोलिसांनी मंगळवारी नवी मुंबईत सापळा लावून आरोपी तांबे याला अटक केली. त्याने ठाणे, मुंबई परिसरात अशाप्रकारे ५० हून अधिक गुन्हे केल्याची कबुली पोलिसांना दिली आहे.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१